# -: प्रेस नोट :-

## वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय पूराडा येथील वनपाल, उपक्षेत्र कोहका, यांचेवर ॲन्टी करप्शन ब्युरोची कारवाई

वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय पूराडा, ता. कुरखेडा जिल्हा गडचिरोली येथील वनपाल श्री. नरेंद्र सिताराम तोकलवार, पद-वनपाल वय-५७ वर्षे, (वर्ग-३) उपक्षेत्र कोहका, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय पूराडा, ता. कुरखेडा जि. गडचिरोली यांना २०,०००/- रुपयाची लाच स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोलीच्या पथकाने आज रंगेहात पकडले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, तक्रारदार यांचे ट्रॅक्टर असून ते घरकूल बांधकामाकरीता शासकिय रॉयल्टिसह रेती वाहतुक करीत असतांना यातील आरोपी लोकसेवक याने तक्रारदार यांचे ट्रॅक्टर पकडून त्यांचे ट्रॅक्टरवर कोणतीही कायदेशीर कारवाई न करता सोडून दिल्याचा मोबदला व पूढे सुरळितपणे रेती वाहतुकीसाठी ट्रॅक्टर चालु देणेकरीता दिनांक २४/०१/२०२५ रोजी पडताळणी केली असता, आलोसे श्री. नरेंद्र सितराम तोकलवार, पद-वनपाल, उपक्षेत्र कोहका, यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून स्वत:चे आर्थिक फायद्या करीता वाम व भ्रष्ट मार्गाने पंच साक्षीदारासमक्ष २५,०००/- रूपयांची सुस्पष्ट मागणी केली असल्याने तक्रारदार यांना आरोपीस लाच रक्कम देण्याची मुळीच ईच्छा नसल्यामुळे त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथील अधिकाऱ्यांना भेटुन तक्रार नोंदविली.

पोलीस उपअधिक्षक श्री. चंद्रशेखर पी. ढोले, ला.प्र.वि. गडचिरोली यांचे पर्यवेक्षणात पो.नि. शिवाजी राठोड व टिम यांनी तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीची अत्यंत गोपनीयरित्या शहानिशा करून सापळा कारवाईचे आयोजन केले असता, त्यामध्ये पडताळणी दरम्यान तक्रारदार यांचे ट्रॅक्टर घरकूल बांधकामाकरीता शासकिय रॉयल्टिसह रेती वाहतुक करीत असतांना यातील आरोपी लोकसेवक याने तक्रारदार यांचे ट्रॅक्टर पकडून त्याचे ट्रॅक्टरवर कोणतीही कायदेशीर कारवाई न करता सोडून दिल्याचा मोबदला व पूढे सुरळितपणे रेती वाहतुकीसाठी ट्रॅक्टर चालु देणेकरीता करीता २५,०००/-रू लाच रक्कमेची पंच साक्षीदारा समक्ष सुस्पष्ट मागणी करून तडजोडीअंती २०,०००/- रूपये स्विकारण्याचे मान्य करून, लाच रक्कम स्विकारतांना मौजा पुराडा येथील वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयाजवळ रंगेहात मिळुन आल्याने त्यांचे विरूध्द पोस्टे, पूराडा, जिल्हा-गडचिरोली येथे अप. क्र ०६/२०२५ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (संशोधन २०१८) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला व अटक करण्यात आली. आरोपी श्री. नरेंद्र सितारामा तोकलवार, पद-वनपाल, यांचे शासकीय वसाहत पुराडा येथील घराची ॲन्टी करप्शन ब्युरो, गडचिरोली चमु कडून झडती घेण्यात आली तसेच त्यांचे मुळ घर चंद्रपुर येथील महाराष्ट्र बॅंकेच्या मागे

दे.गो. तुकुम चंद्रपुर येथील मुळ घराची घर झडती ॲन्टी करप्शन ब्युरो, चंद्रपुर चमू कडुन घेण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक श्री. दिगंबर प्रधान, ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर, श्री. सचिन कदम अपर पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. नागपूर, मा. श्री. संजय पुरंदरे अपर पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. नागपुर यांचे मार्गदर्शनात व पोलीस उपअधिक्षक श्री. चंद्रशेखर पी. ढोले यांचे पर्यवेक्षणात पो.नि. शिवाजी राठोड, पो. नि. संतोष पाटिल, सफौ/ सुनिल पेद्दिवार, पोहवा/ शंकर डांगे, पोहवा/राजेश पद्मगिरीवार, पोहवा/ किशोर जौजांरकर, नापोशि/स्वप्नील बांबोळे, पो.अं. संदीप उडान, संदिप घोरमोडे, प्रविण जुमनाके, हितेश जेट्टीवार, मपोशि/ विद्या म्हशाखेत्री, मपोशि/ज्योत्सना वसाके व चापोहवा/ राजेश्वर कुमरे, सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली यांनी केलेली आहे.

गडचिरोली जिल्हयातील सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, त्यांच्याकडे कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम (एजेंट) कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ ॲन्टी करप्शन ब्युरो, गडचिरोली यांचेशी सपंर्क साधावे असे आवाहन पोलीस उप-अधीक्षक श्री. चंद्रशेखर पी. ढोले यांनी केले आहे.

पोलीस उप-अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, गडचिरोली
दुरध्वनी क्रमांक - ०७१२-२९५०२०, मो.क्रं. ९९२३३३२७५५
टोल फ्रि क्रमांक - १०६४

25.1.25
(चंद्रशेखर पी.ढोले)
पोलीस उप-अधीक्षक
ला.प्र.वि.गडचिरोली